# महाराष्ट्र शासन
## पाटबंधारे विभाग

शासन निर्णय क्रमांक : संकिर्ण १००२/(२०९/२००२)/सिं.व्य.(धोरण)
मंत्रालय, मुंबई-३२. दिनांक : २३ डिसेंबर, २००२.

**प्रस्तावना** :- मुंबई कालवे नियम १९३४ मधील कलम २३ व २५ नुसार जे बागायतदार सिंचनासाठी मंजूर क्षेत्रापेक्षा अनधिकृतपणे जादा क्षेत्रास पाणी घेऊन सिंचन करतील, तसेच जे बागायतदार / संस्था मंजूरी न घेता अनधिकृतपणे पाणी वापर करतील अशा लाभधारकांकडून प्रचलित पाणीपट्टीच्या दराच्या तीनपट पर्यंत दराने (A rate not exceeding triple the rate) दंडनीय आकारणी करावी अशा तरतुदी आहेत.

महाराष्ट्र पाटबंधारे अधिनियम १९७६ भाग-८ कलम ८८ नुसार पाणीपट्टीच्या थकीत रकमेवर १० टक्के विलंब शुल्क आकारण्याबाबत तरतुद आहे.

सदर तरतुदीनुसार क्षेत्रिय स्तरावर विषयांकित प्रकरणामध्ये सरसकट तीनपट आकारणी केली जाते व त्यामुळे दरवर्षी मोठया प्रमाणावर थकबाकी वाढत असल्याचे दिसून येते. परंतु, बरेचसे लाभधारक किंवा बिगर सिंचनासाठी पाणी घेणा-या संस्था यांना दंडनिय दराने आकारणी केल्यामुळे वाद निर्माण होतात. परिणामी, सदर थकबाकी भरण्यास कोणीही पुढे येत नाही. सदर थकबाकीदारांची पुन्हा बिनअर्जी क्षेत्रास कालव्यातुन पाणी घेण्याची प्रवृत्ती दिसून येते. त्यामुळे सदर शेतक-यास क्षेत्रिय अधिका-यांकडून तीनपट दराने आकारणी केली जाते. अशा पध्दतीने थकबाकीदार दुष्टचक्रात अडकून जातो व त्यामुळे सिंचनासाठी पाणी उपलब्ध करुन देण्यास पाटबंधारे विभागास अडचण येते. त्यामुळे पाटबंधारे प्रकल्पातील पाण्याचा कार्यक्षमतेने व पुरेपूर वापर न होता आकारणीवर परिणाम होतो. अशी पाणीपट्टी वसूल करणे दुरापास्त होते. आता यातून व्यवहार्य मार्ग काढणे गरजेचे होते.

सद्यःस्थितीत महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ, दूरसंचार खाते याची देयके ठराविक मुदतीत अदा न केल्यास त्या मुदतीनंतर ठराविक दराने दंडनीय व्याज आकारणी केली जाते. त्यामुळे वसुली होण्यास मदत होते. याच धर्तीवर सिंचन व बिगर सिंचन पाणीपट्टीची थकबाकी वसूल होण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्यासंदर्भात खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात येत आहे.

**<u>शासन निर्णय</u>**

१) (अ) अनाधिकृत्त पाणी (सिंचन / बिगर सिंचन) वापरावरील दंडनिय आकारणी तीनपट ऐवजी अर्जदार असल्यास मंजूरीपेक्षा जादा भिजवलेल्या क्षेत्रास (सव्वापटीने) आकारणी करण्यात यावी.

(ब) बिना अर्जी / मंजूर नसतांना अनाधिकृत्त पाणी (सिंचन / बिगर सिंचन) वापरल्यास त्याची आकारणी दीडपट दराने करावी.

(क) वरीलप्रमाणे सर्व पाणी वापरावर (सिंचन / बिगर सिंचन) पाणीपट्टीशिवाय एकेरी दराच्या पाणीपट्टीवर २० टक्के उपकर देय राहील.

महामंडळ / पाटबंधारे विभागाने दरवर्षी खालील तारखांना प्रत्येक हंगामाची पाणीपट्टी देयके देण्याबाबत कार्यवाही करावी.

खरीब हंगाम - - १५ फेब्रुवारी

रब्बी हंगाम -- १ मे

उन्हाळी हंगाम -- १ ऑक्टोंबर

बारमाही -- १ ऑक्टोंबर

२) पाणीपट्टीच्या रकमेचा भरणा विहीत दिनांकापूर्वी केला नाही तर, सिंचन व बिगर सिंचन या दोन्ही प्रकारच्या आकारणीवर, विहीत दिनांकानंतर दरसाल दर शेकडा १० टक्के प्रमाणे विलंब आकार लावण्यात येईल.

विहीत दिनांकापूर्वी रकमेचा भरणा केल्यास ५ टक्के सुट देय राहील. तसेच हंगामाचे सुरवातीस आगाऊ पाणीपट्टी भरली असल्यास अंतीम देयकाचे वेळी आगाऊ भरलेल्या रकमेवरसुध्दा पाच टक्के सूट देय राहील. जर शासन / महामंडळाकडे काही कारणास्तव आगाऊ पाणीपट्टीचे रुपाने जादा रक्कमेचा भरणा झाल्यास ती संबंधितांचे पुढील देयकात समायोजित करण्यात येईल.

३) वरीलप्रमाणे दंडनीय आकारणीतील सवलत सिंचनासाठी खरीप २००२ पासून व बिगर सिंचनासाठी दिनांक १ एप्रिल, २००२ पासून लागू राहील.

४) वरील कलम ३ च्या तारखेपुर्वीच्या सिंचन व बिगर थकबाकीच्या रकमेवर मात्र पूर्वीप्रमाणेच १० टक्के विलंब शुल्क देय राहील.

हे आदेश पाटबंधारे विभागाच्या अधिपत्याखालील सर्व महामंडळांनाही लागू राहतील.

हा शासन निर्णय वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्रमांक २२६/०२/अर्थबळ, दिनांक १६/११/२००२ अन्वये प्राप्त झालेल्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

वरीलप्रमाणे महाराष्ट्र पाटबंधारे अधिनियम, १९७६ भाग ८ कलम ८८ व मुंबई कालवे नियम १९३४ मधील कलम २३ व २५ मधील तरतुदीत यथावकाश सुधारणा करण्यात येतील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावांने,

(प्र.रा.भामरे)

शासनाचे उप सचिव